राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. १८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक - १५/२/२०१२

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०१२**
**मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करणेबाबत.**

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दि. ३ फेब्रुवारी, २०१२ च्या पत्रान्वये महानगरपालिकांच्या निवडणुका असलेल्या क्षेत्रातील मतदारांना मतदान करणे शक्य व्हावे याकरिता सुट्टी जाहीर करण्याबाबत योग्य ते आदेश काढण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार आपल्या कार्यालयामार्फत सुट्टी जाहीर करण्याबाबत आदेश काढण्यात आले असतील. मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयामध्ये मतदानाच्या दिवशी बँका व इतर कार्यालये सुरु राहतील किंवा कसे याबाबत सतत विचारणा होत आहे.

जिल्हाधिकारी यांनी जाहीर प्रसिध्दी पत्रकाद्वारे आज दुपारी ४ पूर्वी सर्व संबंधितांना पुढीलप्रमाणे आवाहन करावे जेणेकरुन मतदारांना मतदानाचा हक्क योग्यप्रकारे बजावता येईल.-

"मतदार मतदानापासून वंचित राहू नये याकरिता सर्व बँका व इतर आस्थापनांनी (ज्यांना जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेली स्थानिक सुटटी लागू होत नाही) त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना मतदान करता येणे शक्य व्हावे याकरीता कामाच्या तासामधून पुरेशी सवलत देण्यात यावी."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,
धमाकानेड
( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र